जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 APR 2018
सकाळ

# कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या पाठीशी ठाम

## बैठकीत विविध संघटनांनी दिली ग्वाही

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठ प्रशासन व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची विद्यापीठ व विद्यार्थी हिताप्रती बांधिलकी सर्वोच्च आहे. त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही विविध संघटनांनी आज येथे झालेल्या बैठकीत दिली.



शिवाजी युनिव्हर्सिटी पोस्ट ग्रॅज्युएट टिचर्स असोसिएशन (सुप्टा), शिवाजी युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर फोरम, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, शिवाजी विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची विद्यापीठात बैठक झाली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते.

विद्यापीठ व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या संदर्भातील विविध बातम्या ही चिंतेची बाब आहे. डॉ. शिंदे यांच्याकडे कुलपतींनी मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू पदाची जबाबदारी सोपविली, ती ते कौशल्याने पार पाडत आहेत. विद्यापीठाकडे त्यांचे बारकाईने लक्ष आहे. प्रत्येक अधिकार मंडळाची बैठक, अन्य महत्त्वाच्या बैठका, परिषदा, पत्रकार परिषद यांना ते स्वतः उपस्थित राहत आहेत. त्याशिवाय विविध नावीन्यपूर्ण उपक्रमही सुरू आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ प्रशासनही विद्यापीठाच्या व विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी कार्यरत आहे, असे सांगण्यात आले.

8 APR 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरु, प्रशासनाची विद्यापीठ हिताप्रती बांधीलकी सर्वोच्च

## विद्यापीठाशी संबंधित विविध संघटनांच्या बैठकीत सूर



लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ प्रशासन आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची कार्यप्रणाली आणि विद्यापीठ व विद्यार्थी हिताप्रती बांधीलकी सर्वोच्च आहे. त्यामुळे त्यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाशी संबंधित विविध संघटनांनी बैठकीत दिली.

विविध संघटनांच्या पदाधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते. गेल्या काही दिवसांत शिवाजी विद्यापीठ आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या संदर्भातील विविध बातम्या ही चिंतेची बाब आहे. तथापि, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे कुलपती महोदयांनी ज्या विपरित परिस्थितीत मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाची जबाबदारी सोपविली ती कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मोठ्या कौशल्याने आणि आत्मीयतेने पार पाडली आहे आणि पाडत आहेत. या परिस्थितीतही शिवाजी विद्यापीठाकडे त्यांचे बारकाईने लक्ष आहे. तसेच विविध उपक्रम, अधिकारी-कर्मचारी यांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रशासनाला वेळोवेळी आदेशित करीत असतात. कुलगुरू डॉ. शिंदे आणि विद्यापीठ प्रशासन यांच्यासोबत विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्व संघटना कटिबद्ध असून, आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत, असा सूर या बैठकीत उमटला.

बैठकीस शिवाजी युनिव्हर्सिटी पोस्ट ग्रॅज्युएट टिचर्स असोसिएशन , शिवाजी युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर फोरम, विद्यापीठ सेवक संघ, विद्यापीठ कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

8 APR 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK to take action against faculty skipping assessment

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has asked colleges in the division to report the names of the teaching faculty, who despite frequent notices skip assessment duties.

The April 4 circular, a copy of which is with **TOI**, said that the chancellor's office has made it mandatory to announce results within 30 days of the last paper of a particular exam. To attain this goal all available manpower must be utilised.

The circular from Mahesh Kakade, director of board of examinations and evaluation, SUK, stated that summer examinations in the division have begun from March 22. For answer sheet assessment, a district-wise centralised assessment program (CAP) has started. Principals and teachers have been directed to follow instructions from the chancellor's office.

Kakade said, "Earlier, it used to happen that some faculty would not show up for assessment, sighting various reasons. However after the university directive and a directive from the state government in February, the teachers have no choice but to be present for assessment."

He added that despite these instructions, if a faculty member is found to be non-compliant they may face action.

"The action may involve disciplinary action, penalty, issuing a memo or even cancellation of their teaching approval," said Kakade.

According to Kakade, instructions from the government come at the right time, as summer examinations also involve final year students, who mostly opt for higher studies or go for employment opportunities once their exams are over in April or May.

"Announcing the results on time will make sure that these students get their results, mark sheets and queries regarding the same at the earliest without any hassle," Kakade said.

Meanwhile, a notification from Siddharth Kharat, joint secretary of state government on February 5 stated that all non-agriculture universities should announce their results within 30 days. Even if delayed they should announce it within 45 days. Universities have been asked to initiate action to improve their paper assessment. The notification added that college principals should report the teaching faculties avoiding assessment related work to the university, which shall take action against such individuals.

## PASSING THE BUCK

### THE SCENARIO

- Annual exams at SUK: Around 600
- Answer sheets assessed: Around 12 lakh
- Affiliated colleges: 283
- Students: Around 2.5 lakh

**What the Maharashtra Public Universities Act, 2016 says:**

Non-agriculture universities should announce their results within 30 days. Even if delayed, the university should make sure to announce the results within 45 days

- Universities have been asked to initiate action to improve their paper assessment
- College principals should report the teaching faculties avoiding assessment related work to the university, which shall take action against such individuals



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8 APR 2018
पुढारी

# विद्यापीठात नो व्हेईकल डे

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात शनिवारी 'नो व्हेईकल डे' पार पडला. कडक ऊन असतानाही अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थी, प्राध्यापक आदी सर्वांनीच या चांगल्या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. नो व्हेईकल डे मुळे सर्वांनी वाहने कॅम्पसबाहेरच लावली होती. त्यामुळे विद्यापीठाच्या आवारात रोजच्यासारखा वाहनांचा व हॉर्नचा आवाज नव्हता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# डॉ. काशीद यांचा सत्कार

कोल्हापूरः शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. एन. काशीद यांची विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्यपदी निवड झाल्याबद्दल प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. रवळनाथ को-ऑपरेटिव्ह फायनान्स सोसायटीच्यावतीने सत्कार केला.